**विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय,**
**नगरपालिका शाखा**
**पहिला मजला, कोकणभवन, सी.बी.डी.बेलापूर, नवीमुंबई -४०० ६१४**
**दूरध्वनीक्रमांक:-२७५७४२३१** **ई-मेल : kokanardma१@gmail.com**
**पत्र क्र.साशा/कार्या-२/नपा-२/वसई-विरार 29 गावे /कावि** **दिनांक :-24/11/2020**

प्रति,
आयुक्त,
वसई-विरार शहर महानगरपालिका
जिल्हा-पालघर

विषय:-वसई-विरार शहर महानगरपालिकेतुन 29 गावे वगळण्याबाबत.
संदर्भ:-1) महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,यांचे कडिल पत्र क्र.वविम-2011/प्र.क.511/नवि-23,दिनांक 26 ऑक्टोबर 2020,प्राप्त दिनांक 09 नोव्हेंबर 2020.
2)या कार्यालयाचे पत्र क्र.साशा/कार्या-3/नपा-2/वसई-विरार 29 गावे/कावि दिनांक 11/11/2020.
3) महाराष्ट्र शासन,न्यायालयान प्रकरण/सर्वप्राथम्य,क्र.वविम-2011/प्र.क्र.511/नवि-23,दिनांक-23 नोव्हेंबर 2020

उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र.1 अन्वये मा.उच्च न्यायालयात दि.08/10/2020 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यासाठी प्रस्तावित 29 गावांसंदर्भात सदर क्षेत्रातील सर्व घटकांसोबत व्यापक सल्लामसलत करुन त्यानुसार अहवाल सादर करण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत.

सदर प्रकरणी संदर्भ क्र.2 अनुसार 29 गावांतील सर्व संबंधित व्यक्ती/नागरिक/स्थानिक लोकप्रतिनिधी/संघटना यांचे कडुन प्राप्त लेखी सुचना व हरकती सादर करणेबाबतच्या आवाहनास स्थानिक वृत्तपत्रे,स्थानिक वृत्तवाहिन्या, फिरत्या वाहनामधुन ध्वनीक्षेपकाद्वारे तसेच दवंडीद्वारे इ. माध्यमातुन व्यापक प्रसिध्दी द्यावी, तसेच ही सूचना महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालये, प्रमुख ठिकाणे ,प्रभाग कार्यालये, इ. ठिकाणी प्रसिध्दी करण्याबाबत लेखी हरकती व सुचना जाहिर करण्यासाठी आपणास दिनांक-11/11/2020 रोजी पत्र पाठविले आहे.

तथापि संदर्भ क्र.3अनुसार सदर क्षेत्रात मा.उच्च न्यायालयाच्या दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञा पत्रात नमुद केल्यानुसार सदर क्षेत्रात "Unit of Administration" काय असावे ? म्हणजेच पुन्हा ग्रामपंचायती ठेवाव्या अथवा स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी याबाबत देखील संबंधित इच्छुक व्यक्ती /संस्था/ लोकप्रतनिधी इत्यादी.यांचे कडुन दिनांक 25 नोव्हेंबर ते 01 डिसेंबर 2020 पर्यंत जाहिर सुचनेत नमूद ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत लेखी हरकती/सुचना/निवेदने दाखल करणेसाठी कार्यक्रम निश्चित करणेत आला आहे.

सदर प्रकरणी 29 गावांतील सर्व संबंधित व्यक्ती/नागरिक/स्थानिक लोकप्रतिनिधी/संघटना यांचे कडुन प्राप्त लेखी सुचना व हरकती सादर करणेबाबतच्या आवाहनास स्थानिक वृत्तपत्रे,स्थानिक वृत्तवाहिन्या, फिरत्या वाहनामधुन ध्वनीक्षेपकाद्वारे तसेच दवंडीद्वारे इ. माध्यमातुन व्यापक प्रसिध्दी द्यावी, तसेच ही सूचना महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालये, प्रमुख ठिकाणे ,प्रभाग कार्यालये, इ. ठिकाणी प्रसिध्द करावी.

**सोबत**:- जाहीर सुचनेची प्रत जोडली आहे.
(माननीय विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेने)

(श्री. मनोज रानडे)
उपायुक्त, सामान्य प्रशासन

# जाहीर सुचना

शासन अधिसूचना क्र. वविम-2009/88/प्रकरण 244/09/नवि-23 दिनांक 31.05.2011 संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरु असलेल्या याचिकेमध्ये दिनांक 08/10/2020 रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यासाठी प्रस्तावित 29 गावांसंदर्भात त्या क्षेत्रातील सर्व घटकांसोबत व्यापक सल्लामसलत करुन तद्नंतर यथोचित अंतिम निर्णय घेण्याचे शासनास आदेश दिले आहेत. त्यानुसार शासनाने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच दिनांक २३/११/२०२० च्या पत्रान्वये **"Unit of Administration"** काय असावे ? याबाबत देखील हरकती सुचना प्राप्त करुन योग्य अभिप्राय सादर करणेत कळविले आहे.

सद्यस्थितीतत कोव्हीड-19 चा प्रादुर्भाव विचारात घेता प्रत्यक्ष सुनावण्या घेणे संयुक्तिक होणार नाही याकरीता प्रस्तुत क्षेत्रातील व्यक्ती/संस्था/लोकप्रतिनिधी इत्यादीनाआपल्या लेखी हरकती /सूचना /निवेदने सादर करण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक असल्यामुळे वाढीव कालावधी देण्यात येत आहे.वसई विरार महानगरपालिकेतून 29 गावे वगळणे बाबतच्या हरकती सूचना बरोबरच संबंधित 29 गावे हि महापालिकेतून वगळल्यास/ वेगळी झाल्यास "Unit of Administration" काय असावे म्हणजेच ती ग्रामपंचायतीच्या स्वरुपात रहावी अथवा त्यांची स्वतंत्र नगरपालिका व्हावी. याबाबत नागरिकांना हरकती/सुचना/निवेदने दाखल करणेसाठी खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चित केला आहे व अधिकारी यांना निर्देशित करण्यात येत आहे.

| **लेखी सुचना व हरकती दाखल करण्याचा कालावधी** | **सुचना व हरकती दाखल करण्याची ठिकाणे** | **संबंधित अधिकारी** |
|---|---|---|
| २५ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर २०२० (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) | उपविभागीय अधिकारी कार्यालय,वसई जि-पालघर | उपविभागीय अधिकारी,वसई |
| | वसई-विरार शहर महानगरपालिका,उपायुक्त यांचे कार्यालय,विरार | उपायुक्त,(सामान्य) वसई विरार शहर महानगरपालिका |
| | निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय,पालघर | निवासी उपजिल्हाधिकारी,पालघर |
| | प्रादेशिक उपसंचालक यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई. | प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन, कोकण विभाग. |

तरी या जाहीर सुचनेद्वारे आवाहन करण्यात येते की उक्त कार्यक्रमानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतुन 29 गावे वगळण्याबाबत तसेच गावे वगळल्यास "Unit of Administration" म्हणजेच पुन्हा ग्रामपंचायती ठेवाव्या अथवा स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी याबाबत देखील संबंधित इच्छुक व्यक्ती /संस्था/ लोकप्रतनिधी इत्यादी यांनी उपरोक्त नमूद ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत लेखी हरकती/सुचना/निवेदने सादर करावी.

सही /-

(अण्णासाहेब मिसाळ)

विभागीय आयुक्त,कोकण विभाग